।। जनसेवा हिच ईश्वर सेवा ।।

# संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

संगमनेर - ४२२६०५, जि. अहमदनगर दूरध्वनी-(०२४२५)२२५३०८,२२५१६५,२२७२३८
फॅक्स - २२५९६३

स.न.पा./जा.क्र.आरोग्य/०४/३१६८/२०२२ दिनांक : १७/११/२०२२

## जाहीर सूचना

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणाकरिता संगमनेर नगरपरिषदेमध्ये एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ ११ महिन्यासाठी शहर समन्वयक (City Coordinator) यांची नियुक्ती करावयाची आहे. खाली नमूद केलेले कंत्राटी पद भरण्यासाठी दि. १८/११/२०२२ ते २४/११/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संगमनेर नगरपरिषद, संगमनेर जि. अमहदनगर येथे विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सीलबंद लिफाफ्यात (पाकिटात) हार्ड कॉपी मध्ये स्वीकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही तसेच ई-मेल द्वारे केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही. विहित नमुना अर्ज तसेच याबाबतच्या अटी व शर्ती उपरोक्त कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत संगमनेर नगरपरिषद, संगमनेर जि. अहमदनगर कार्यालयात पहावयास मिळेल. तरी इच्छुक/पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विहित मुदतीत सादर करावा.

| पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा |
|---|---|---|
| शहर समन्वयक (City Coordinator) १ पद (एकत्रित मासिक मानधन ४५,०००/-) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>अ) बी.ई./बी.टेक. (कोणतीही शाखा)<br>ब) बी. आर्क.<br>क) बी. प्लानिंग<br>ड) बी.एस्सी (कोणतीही पदवी)<br>२) अनुभव<br>अ) स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे.<br>ब)शहर समन्वयक (City Coordinator) चा अनुभव (एकूण वर्ष)<br>क) शहर समन्वयक (City Coordinator)च्या व्यतिरिक्त स्वच्छ सर्वेक्षण / घनकचरा व्यवस्थापन/पर्यावरण विभागात कामाचा अनुभव | वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल.) |

पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येईल. सदर प्रक्रियेत बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवण्यात आलेले आहे. याबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही.

(राहुल वाघ)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद संगमनेर